**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**सोमवार, दिनांक ११ जानेवारी, २०२१ / पौष २१, १९४२ (शके)**

## ३. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) सत्र शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी संस्थगित झाले. उपरोक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविल्यानुसार लक्षवेधी सुचनांसंदर्भातील जोडपत्रामधील प्रलंबित **१००** लक्षवेधी सूचनांपैकी **३२** लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२० रोजी पत्रक भाग-२ व्दारे तसेच **६८** प्रलंबित सूचनांच्या निवेदनापैकी **२५** सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १० ऑगस्ट, २०२० रोजी, **२१** सूचनांची निवेदने गुरुवार, दिनांक १७ सप्टेंबर, २०२० व **१०** सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता **१२** प्रलंबित सूचनांच्या निवेदनापैकी **९** सूचनांची निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत. प्रलंबित **३** निवेदनांबाबत संबंधित मंत्रालयीन विभागांकडे पाठपुरावा करण्यात येत असून सदर निवेदने प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या प्रती वितरीत करण्यात येतील.

**विधान भवन**,
**मुंबई,**
दिनांक : ११ जानेवारी, २०२१

**राजेन्द्र भागवत**
सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

गृह विभाग (19)

लक्षवेधी सूचना

विधानसभा

द्वितीय (अर्थसंकल्पीय)अधिवेशन २०२०

सर्वश्री. समीर कुणावार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.

"हिंगणघाट तालुक्यात गत ६ महिन्यांपासून मुली बेपत्ता झाल्याचे २३ गुन्हे दाखल आहेत ज्यात १९ मुली व ४ मुलांचा समावेश असून यातील १५ मुलांचा शोध लागल्यानंतर १९ पैकी १ मुलगी अद्यापही न मिळाल्यामुळे सदर मुलीचे पिता विजय मोरे नामक या व्यक्तीने आत्महत्या केल्यानंतरही वर्षभरापासून ४ मुलीचा शोध पोलीस प्रशासनाकडून न लागणे व तसेच लापत्ता असलेल्या मुलींच्या पालकांना पोलीस प्रशासनाकडून निर्लज व अपमानास्पद वागणूक मिळणे, पोलीसांच्या बेजाबाबदारीच्या वागण्यामुळे पित्याची आत्महत्या होणे, त्यामुळे आत्महत्याग्रस्त पित्याकडून पोलीस प्रशासनातील दोन अधिका-यांच्या नावाची चिठठी सापडणे, अशी घटना घडूनही अद्यापही पोलीस प्रशासनाकडून मुलींचा शोध लावण्यात अद्यापही यश न येणे, त्यामुळे हिंगणघाट शहर व परिसरात पोलीस प्रशासनाबद्दल तीव्र नाराजीचे पडसाद उमटणे व आत्महत्याग्रस्त व्यक्तीच्या पत्नीने हिंगणघाट पोलीस ठाण्यातील पोलीसांना मुलीचा तपास करावा अशी विनंती केल्यानंतरही पुन्हा पोलीस प्रशासनाकडून सदर महिलेस अपमानास्पद वागणूक देत असल्यामुळे हिंगणघाट परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया"

*************************

मा.गृहमंत्री महोदयांचे निवेदन

हिंगणघाट पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात जुन २०१९ ते डिसेंबर २०१९ या कालावधीत १३ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या होत्या त्यासंबंधाने कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हे नोंद करुन मुलींचा १२ मुलींचा शोध घेण्यात आला.उर्वरीत १ मुलगी मिळून आली नसल्याने त्याबाबत अप.क्र.४०३/२०१९ कलम ३६३ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

नमूद गुन्हयाचे तपासात पिडीत व आरोपी हे दिनांक ०३/०३/२०२० रोजी वर्धा येथे सापडले. पिडीता आरोपी अमोल नाईक नावाच्या मुलासोबत समतानगर वर्धा येथे ८ महिने राहिली. आईवडीलांच्या भितीपोटी तिने घरी संपर्क केला नाही. सदर घटनेपुर्वी पिडीत ही आरोपी अमोल सोबत फोनवर बोलतांना तिच्या वडीलांना दिसली होती. तेव्हा पिडीतेला तिच्या वडिलांनी त्या मुलाशी संपर्क

ठेवायचा नाही असे म्हटले होते. तसेच अमोलला फोनवर त्यांच्या मुलीला फोन केला तर पोलीसात तक्रार करील असा दम दिला होता. आरोपीस अटक करण्यात आली असून त्याचा पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आला आहे. तक्रार देतेवेळी फिर्यादी विजय मोरे व त्यांच्या पत्नी सुनिता मोरे यांनी पिडीतेचे आरोपी सोबतच्या संपर्काबाबत पोलीस स्टेशन ला तक्रार देते वेळी व त्यानंतरही तपासात कोणतीही माहिती दिली नव्हती.

कु. अश्विनी मोरे ही बेपत्ता झाल्यानंतर तिच्या आईवडिलांना पोलीसांकरवी अपमानास्पद वागणूक देण्यात आली नव्हती. मुलीचे पिता श्री. विजय नारायण मोरे यांनी दि. २८.११.२०१९ रोजी राहत्या घरी गळफास घेवून आत्महत्या केली. त्याअनुषंगाने आकस्मिक मृत्यू नोंदवून घटनास्थळाचा पंचनामा व इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात आला होता. त्यावेळी विजय मोरे यांच्याजवळ सुसाईड नोट मिळाली नव्हती. श्री. विजय मोरे यांच्या मृत्यूच्या अनुषंगाने त्यांच्या पत्नी श्रीमती सुनिता मोरे यांची विचारपूस केली असता मुलगी अश्विनी मोरे घरुन निघून गेल्याच्या दु:खामुळे आत्महत्या केली असल्याचे जबाबात सांगितले आहे.

श्रीमती. सुनिता विजय मोरे हयांना चौकशी दरम्यान पोलीसांकडून अपमानास्पद वागणूक देण्यात आलेली नाही वा त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण झाला नव्हता. सदर प्रकरणी गुन्हयाचा तपास पूर्ण करुन आरोपी विरुध्द दि.१८/०७/२०२० रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

*************************

लक्षवेधी सुचना क्रमांक : २० गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

ॲड. राहुल नार्वेकर, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना क्र. २० पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईमध्ये बॉम्बे स्टॉक एक्सेंज, नॅशनल स्टॉक एक्सेंज यामध्ये दर आठवड्याला सोमवार ते शुक्रवार या पाच दिवसांच्या कालावधीमध्ये रजिस्टर कंपनीच्या शेअर्सची खरेदी-विक्री व्यवहार जवळजवळ ६० हजार करोडो रुपयांपर्यंत चालत असणे. परंतु सध्या मुंबईमध्ये गेल्याकाही महिन्यांपासून खाजगी लोकांची टोळी मुंबई स्टॉक एक्सेंज व नॅशनल स्टॉक एक्सेंजच्या शेअर्स मुल्यांकनावर व धर्तीवर रोखीने आठवड्याने सातही दिवस दररोज साधरणत: ३ लाख करोड रुपये पर्यंत डब्बावाला ट्रेडिंग या नावाने करीत असून या व्यवहारामध्ये जोपैसा येतो तो पैसा कुणाचा असतो, कशाप्रकारे येतो व कशा प्रकारे जातो याचा शासकीय एजन्सीला कोणताही सुगावा न लागणे मात्र व्यवहार चोखदृष्ट्या होत असणे, महाराष्ट्रातील जनतेला याकडे आकर्षित करण्यासाठी सुरुवातीला फायदा दाखवून लाखो-करोडो रुपये त्यांच्याकडून उखळले जात असणे. त्यानंतर त्यांना शेअर्स ट्रेडिंगमध्ये तोटा झाला असे दर्शवून नागरीकांची मोठ्या प्रमाणावर करण्यात येत असलेली फसवणूक, झालेल्या आर्थिक फसवणूकीमुळे अनेक नागरीकांचे झालेले मोठे नुकसान, परिणामी शेअर्स खरेदी-विक्री (डब्बावाला ट्रॅझॅक्शन) ट्रेडिंग कंपनीच्या फसवणुकीमुळे मुंबईतील अनेक नागरीकांमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, या सर्व व्यवहाराबाबत आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई पोलिस यांच्याकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मुंबईमध्ये दरदिवशी शेअर्सद्वारे (डब्बावाला ट्रॅझॅक्शन) करोडो रुपयांची होत असलेली उलाढाल व त्यामध्ये उध्दवस्त झालेल्या नागरीकांचे जीवनमान याला आळा बसण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.गृह मंत्री यांचे निवेदन

आर्थिक गुन्हे विभागात सन २०१८ ते अद्याप पावेतो डब्बा ट्रेडींगबाबत गुन्ह्याची नोंद झालेली नाही. याबाबत कारवाई करण्यासाठी सेबी ही संस्था सक्षम प्राधिकरण आहे. डब्बा ट्रेडींगबाबत आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर सेबीच्या मदतीने कार्यवाही करण्यात येईल.

सन २०१६ साली आर्थिक गुन्हे विभाग, नागपूर यांनी गुन्हा नोंद क्रमांक १०२/१६, १५३/१६ व १५५/१६ नुसार दाखल गुन्ह्यामध्ये आरोपींनी अटकपूर्व जामीनाकरिता मा.उच्च न्यायालय, नागपूर येथे अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाच्या सुनावणीअंती नागपूर पोलिसांनी सेक्युरिटीज कॉन्ट्रक्ट रेग्युलेशन ॲक्ट १९५६ मधील कलम २३(१) नुसार केलेली कार्यवाही ही योग्य नसून पोलीस हे सदर कार्यवाही करण्याकरिता सक्षम प्राधिकरण नसल्याने आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

डब्बा ट्रेडींग ही बेकायदेशीर शेअर्स ट्रेडींग असल्यामुळे त्यावर कार्यवाही ही सेक्युरिटीज कॉन्ट्रक्ट रेग्युलेशन ॲक्ट १९५६ मधील २३(१) अन्वये करण्यात येते. नागपूर आर्थिक गुन्हे विभाग, नागपूर यांनी केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने आरोपी व्यक्तींनी अटकपूर्व जामीनाकरिता ४४५/२०१६, ४४६/२०१६ व ४४७/२०१६ नुसार मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे अर्ज केला होता. त्याअनुषंगाने मा.न्यायालयाने दिनांक २४.१०.२०१६ रोजीच्या निकालपत्रामध्ये पोलीसांना सेक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट रेग्युलेशन ॲक्ट १९५६ मधील कलम २३(१) प्रमाणे डब्बा ट्रेडींगवर कार्यवाही करण्याचे अधिकार

नसल्याचे नमूद केले आहे. सेक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट रेग्युलेशन ॲक्ट १९५६ मधील कलम २६ नुसार सक्षम प्राधिकरणाने तक्रार दिली असे तर न्यायालय दखल घेईल असे निकाल पत्रात म्हटले आहे. सेक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट रेग्युलेशन ॲक्ट १९५६ मधील कलम २६ अन्वये सक्षम प्राधिकरण म्हणून केंद्र सरकार, राज्य सरकार, सेबी, एक्सचेंजेस व इतर व्यक्ती कार्यवाही करु शकतात. मात्र या कायद्याने पोलीस अधिकारी कार्यवाही करु शकत नसल्याचे निकालपत्रात नमूद केले आहे.

मा.उच्च न्यायालय, नागपूर यांनी दिलेल्या निकालाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे नागपूर आर्थिक गुन्हे विभाग,नागपूर यांनी स्पेशल लिव्ह पिटीशन (क्रिमीनल) क्रमांक ७४८/२०१७ अन्वये अपिल दाखल केले आहे. या प्रकरणी दिनांक २०.०३.२०२० रोजी सुनावणी झाली असून अंतिम निर्णय येणे बाकी आहे. डब्बा ट्रेडींग संदर्भात उपरोक्त उल्लेख केलेल्या सक्षम प्राधिकरणाकडून तक्रार प्राप्त झाल्यास त्याबाबत शहानिशा करुन मा.उच्च न्यायालय, नागपूर यांच्या दिनांक २४.१०.२०१६ रोजीच्या निकालपत्राच्या अधिन राहून योग्य ती कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-*****०*****-

H 1902-1a.

लक्षवेधी सूचना

गृह विभाग

सन २०२० चे दुसरे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**सर्वश्री. प्रशांत ठाकूर, महेश बालदी, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड आशिष शेलार, कालीदास कोळंबकर. वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना.**

लक्षवेधी सूचना

"राज्यात विशेषत: पनवेल (जि. रायगड) तालुक्यात अनेक विकासकांनी अमिषे दाखवून सदनिका विकून नागरिकांची मोठया प्रमाणात केलेली फसवणूक केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० रोजी निदर्शनास येणे, नागरिकांकडून बोगस करारनामे करुन घरांच्या किंमती वसूल करणे, प्रत्यक्षात अशा कोणत्याही गृह प्रकल्पाची विकासकांकडे शासनाची मंजूरी नसणे, फसवणूकीच्या अशा प्रकारच्या अनेक तक्रारी पनवेल व आसपासच्या पोलीस स्टेशनमध्ये नागरिकांकडून दाखल होऊन सुध्दा पोलीस यंत्रणा त्यावर कोणतीही कारवाई करत नसणे, तक्रार केल्यास पैसे परत मिळणार नाहीत या भितीने फसवणूक उघडीस येवूनही अनेक वर्षे तक्रार करण्यात न येणे, गृह निर्माण अधिनियम २०१२ चा कायदा मा.राष्ट्रपती महोदय यांनी पारित करुनही त्याची अंमलबजावणी होत नसणे, MPID (एमपीआयडी) कायदा अंमलात असून सुध्दा फसवणूक करणाऱ्या विकासकांवर शासनाकडून कोणतीच कारवाई अद्यापपर्यंत न होणे, महारेराने गृह प्रकल्प वेळेत पूर्ण न केल्यामुळे ग्राहकांचे पैसे व्याजासह परत देण्याचा आदेश संबंधित विकासकांना देऊनही विकासकांनी ग्राहकांचे पैसे अद्यापपर्यंत दिलेले नसणे, विकासकांवर कोणत्याच विभागाककडून ठोस कारवाई होत नसल्यामुळे दरवर्षी ग्राहकांच्या फसवणूकीच्या प्रकरणात होत असलेली वाढ, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया"

मा.मंत्री (गृह) यांचे निवेदन

राज्यात विशेषत: पनवेल (जि. रायगड) तालुक्यात अनेक विकासकांनी अमिषे दाखवून सदनिका विकून नागरिकांची मोठया प्रमाणात फसवणूक केल्याने माहे फेब्रुवारी, २०२० च्या सुमारास दाखल झालेल्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, नवी मुंबई कार्यक्षेत्रात खांदेश्वर पोलीस ठाणे येथे ३ गुन्हे दाखल झाले असून एक गुन्ह्याचा तपास चालू आहे. दुसऱ्या गुन्ह्यातील आरोपी दिलेल्या पत्त्यावर मिळून आला नाही तसेच तीसऱ्या गुन्ह्यात आरोपींची मालमत्ता गोठवून गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे. तर न्हावाशेवा पोलीस ठाणे येथे १ गुन्हा दाखल झाला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

पोलीस आयुक्त ठाणे यांचे कार्यक्षेत्रात खडकपाडा पोलीस स्टेशन येथे १ गुन्हा दाखल असून सदर गुन्ह तपासावर आहे.

नागपूर शहर कार्यक्षेत्रात अंबाझरी पोलीस ठाणे येथे १ व बेलतरोडी पोलीस ठाणे येथे १ असे दोन गुन्हे दाखल असून दोन्ही गुन्हे तपासावर आहेत.

रत्नागिरी पोलीस अधीक्षक यांच्या कार्यक्षेत्रात चिपळूण पोलीस ठाणे येथे १ गुन्हा दाखल असून गुन्ह्यातील आरोपी विरुध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर केले आहे व गुहागर पोलीस ठाणे येथे १ गुन्हा दाखल असून मा.प्रथमवर्ग न्यायालय गुहागर यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

चंद्रपूर पोलीस अधीक्षक यांच्या कार्यक्षेत्रात रामनगर पोलीस ठाणे येथे २ गुन्हे दाखल असून दोन्ही गुन्हे न्यायालयात प्रलंबित आहेत.

पोलीस आयुक्त पुणे यांचे कार्यक्षेत्रात हिंजवडी पोलीस ठाणे येथे २ गुन्हे दाखल असून एका गुन्ह्यात आरोपीचा अटकपूर्व जामीन मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. तर दुसरा गुन्हा तपासावर आहे.

राज्यात विकासकांनी नागरिकांची केलेल्या फसवणुकीच्या अनुषंगाने एमपीआयडी कायद्यान्वये सदर विकासकांवर करण्यात आलेली कायदेशिर कारवाई खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | दाखल | उघड | अटक आरोपी | फसवणूक झालेली मालमत्ता | जप्त मालमत्ता |
|---|---|---|---|---|---|
| २०१७ | ११९ | १०५ | २७२ | ९,,७२,०५,१२,३५१/- | ३,२३,९८,१२,१०३/- |
| २०१८ | १९२ | १७८ | ३२२ | १४,३१,८८,४१,९५७/- | १,७३,८०,०७,२३६/- |
| २०१९ | १७० | १५४ | १८१ | ६,०५,४३,३०,४६४/- | ८५,०६,२२,२३४/- |

************

H/1835-19

लक्षवेधी सुचना क्रमांक : २५ गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. सुनिल प्रभू, विधानसभा सदस्य यांची लक्षवेधी सूचना क्र.२५ पुढीलप्रमाणे आहे :-

" मालाड (पूर्व) येथील कुरार गांव, हनुमान नगर,मुनशी चाळ येथे राहणा-या कु.राजन जितेंद्र नार्वेकर या मुलाचा अपघात घडवून खुन केल्याची दिनांक ०१.०२.२०२० रोजी उघडकीस आलेली घटना,सदरहू मयत राजेंद्र नार्वेकर हा दिनांक ३१.०१.२०२० रोजी सायंकाळी घरातून मित्रासोबत घराबाहेर पडणे, त्यानंतर थेट त्याचा अपघात झाल्याचा दुरध्वनी पालकांना मिळणे, पालकांनी कुमार राजनला जखमी अवस्थेत ट्रॉमा केअर सेंटरमध्ये घेऊन गेले असता तेथे डॉक्टरांनी त्यास मृत घोषित करणे, एकुलता एक मुलगा गेल्याने सदर कुटुंबावर कोसळलेली शोककळा व दुःखाचे संकट, अपघात स्थळी कुमार राजेंद्रच्या मोटर सायकलला कोणतेही नुकसान न होणे,तसेच मृतदेह संशयी स्थितीत पडलेला आढळून येणे,यामुळे राजनचा अपघाती मृत्यू नसून खात्रीलायकरित्या खून झाला असल्याचा पालकांकडून सांगण्यात येणे, सदर संशयीत खून प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन दोषीं विरुध्द कारवाई करण्याची नितांत आवश्यकता व प्रतिक्रिया."

---

## मा.गृह मंत्री यांचे निवेदन

याबाबत गोरेगांव पोलीस ठाण्यात दिनांक ०१.०२.२०२० रोजी अपमृत्यू नोंद क्रमांक ०७/२०२० अन्वये नोंद करण्यात आली होती. यातील मयत इसमाच्या वडीलांच्या तक्रारी अर्जावरुन गोरेगांव पोलीस ठाणे येथे दिनांक १८.०२.२०२० रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक ७६/२०२० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मयत इसम यांनी दिनांक ३१.०१.२०२० रोजी मित्रांसोबत हॉटेल आर.ए.गार्डन, गोरेगांव (पूर्व) या ठिकाणी मित्रासमवेत पार्टी केली. त्या पार्टी दरम्यान मद्यप्राशन केले असे मित्रांनी जबाबात सांगितले. त्यातील काही मित्रांना घरी सोडल्यानंतर मयत इसमाने त्याच रात्री दिनांक ०१.०२.२०२० रोजी मयत इसमाच्या मालकीच्या मालाड पूर्व येथे असणा-या गोडावूनवर मित्रासमवेत पार्टी केली. सदर पार्टी दरम्यान मयत इसमाने आणखी मद्यप्राशन केले. मयत इसमाने व त्याचे मित्रानी काही मित्रांना घरी सोडल्यानंतर मयत इसम व नितेश फडते व निलेश बोरगे यांनी मालाड (पश्चिम) येथील रेस्टॉरंटवर जेवण्याकरिता जाण्याचा बेत केला.मयत इसम सिगारेट घेण्यासाठी ओबेरॉय मॉल येथे थांबल्यानंतर इतर मित्र पुढे निघून गेले. काही वेळाने मयत इसम ओबेरॉय मॉल, गोरेगांव पूर्व येथून मोटरसायकल चालवित मालाड पश्चिम, मुंबईच्या दिशेने एकटाच गेला. सदर गुन्ह्यातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी एम.टी.एन,एल. ब्रिज ओलांडताना ब्रिजवर मागे अपघाताचा आवाज ऐकला व त्यांनी तात्काळ मागे जाऊन पाहिले असता सदर मयत इसम हा रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडला होता. त्याच्या डोक्याला व चेह-याला जबर दुखापत झाली होती. गुन्ह्याच्या तपासात मिळून आलेल्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच उपलब्ध तांत्रिक मुद्यावरुन मयत इसमास कोणत्याही वाहनाने धडक दिल्याचे निष्पन्न झालेले नाही. मयत इसमास झालेली गंभीर जखम ही पुलाच्या कठड्यावर लावलेल्या एच आकाराच्या लोखंडी पोलला डोके जोरात आदळल्यामुळे झाली असल्याचे परिस्थितीजन्य पुराव्यावरुन दिसून येत आहे. मयत इसमाचे शवविच्छेदन करण्यात आले असून, सदर मयत इसमाच्या मृत्यूचे प्राथमिक कारण Crush injury to head and face. However blood preserved for chemical analysis असे देण्यात आले असून,मयत इसमाच्या रक्ताचा नमुना रासायनिक विश्लेषणाकरिता देण्यात आला आहे. शवविच्छेदनाचा अंतिम अहवाल आणि रक्ताचा रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त होताच त्याअनुषंगाने पुढील कारवाई करण्यात येईल.

RDTAI H 1892 (800-12-2020). —**********—

**नियम १०५ अन्वये लक्षवेधी सुचना**

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२० चे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री प्रशांत ठाकूर, ॲड.आशिष शेलार,कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. दिपक चव्हाण, अशोक पवार, बबनराव शिंदे, नरहरी झिरवाळ, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री संग्राम जगताप, यशवंत माने, सुनिल शेळके, बाळासाहेब आजबे, शेखर निकम, दौलत दरोडा, संदिप क्षिरसागर, मकरंद जाधव-पाटील, निलेश लंके, सुनिल भुसारा, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अनिल पाटील, भारत भालके, बाबासाहेब पाटील, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, मानसिंग नाईक, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, नितीन पवार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री. अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, आशुतोष काळे, राजेश पाटील, राजू कारेमोरे, दिलीपराव बनकर, प्रकाश सोळंके, श्रीमती सरोज आहिरे, राधाकृष्ण विखे - पाटील, अबू आजमी, रईस शेख, गोवर्धन शर्मा, डॉ. संजय कुटे, सर्वश्री. रणधीर सावरकर, जयकुमार गोरे, .ॲड. राहूल कुल विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेल्या लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.**

---

" राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून दिनांक २६ जानेवारी २०१४ रोजी पासून रुग्णांना व प्रसुतीसाठी अडलेल्या महिलांना गोल्डन अवरमध्ये तातडीने वैदयकीय सेवा मिळावी म्हणून शासनाने १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात येणे, त्यासाठी पुरवठादार म्हणून बी.व्ही.जी. इंडिया या संस्थेची निवड करण्यात येणे, त्यानुसार कंपनीने राज्यात २२३ प्रगत, तर ७०४ प्राथमिक जीवनदायी, अशा एकूण ९३७ रुग्णवाहिकांच्या सेवा पुरविण्यात येणे, सदर योजनांतर्गत झालेला सामंजस्य करार दिनांक ३१ जानेवारी, २०१९ रोजी संपुष्टात येणे, परंतु रुग्णसेवेत अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून सदरचा करार संपुष्टात येवूनही सन २०१९ मध्ये कंपनीस तीनवेळा मुदतवाढ देण्यात येणे, तथापि सद्य:परिस्थितीत राज्याच्या अनेक भागातून या रुग्णवाहिकांच्या सेवासंदर्भात सतत तक्रारी येत असणे, तसेच रुग्णवाहिकेतील डॉक्टरांचे वेतन देखील अनेक महिन्यांपासून देण्यात न येणे, या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याबाबत शासनाने विशेष समिती गठीत करुन समितीने आपला अहवाल मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे सादर करण्यात येवूनही शासनाकडून सदर समितींच्या अहवालावर कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी राज्यातील सर्वसामान्य (विशेष ग्रामीण भागातील) जनतेमध्ये पसरलेले चिंतेचे व नैराश्याचे वातावरण व शासनाप्रती असंतोषाची भावना,त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही "

## मा.श्री.राजेश टोपे, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन

रस्त्यावरील अपघात, सर्व गंभीर स्वरुपाच्या आजाराचे रुग्ण, बाळंतपणातील गुतांगुतीचे रुग्ण, नवजात अर्भकाशी संबंधित आजार, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीत सापडलेले रुग्ण, ह्दय रुग्ण, सर्पदंश, अपघात, विषबाधा, श्वासोच्छवासाचे गंभीर आजार, मेंदुशी संबंधित गंभीर आजार इत्यादीं स्वरुपाच्या आपत्कालीन परिस्थितीत गंभीर स्वरुपाच्या रुग्णांना सुसज्ज रुग्णवाहिकेत प्राथमिक उपचार करुन नजीकच्या रुग्णालयांमध्ये पुढील उपचारासाठी भरती करण्यासाठी आपत्कालीन वैदयकिय सेवा प्रकल्प सुरु करण्यात आला. या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र राज्यात २३३ प्रगत जीवनदायी व ७०४ प्राथमिक जीवनदायी अशा एकूण ९३७ रुग्णवाहिका सन २०१४ पासून कार्यन्वित आहेत. सदर योजनेत सद्यस्थितीत राज्यात ४६ लाखांपेक्षा जास्त रुग्णांना सदर सेवेव्दारे सेवा देण्यात आलेली आहे. सदर सेवेचा ५ वर्ष कालावधीचा करारनामा दिनांक ३१ जानेवारी २०१९ रोजी संपुष्टात आला होता. सदर जीवनावश्यक असलेल्या आपत्कालीन योजनेच्या रुग्णसेवेत अडचणी येऊ नये म्हणून सेवा पुरवठादारास दि.३१ जानेवारी २०२० पर्यंत वेळोवेळी तात्पुरत्या स्वरुपात मुदतवाढ देण्यात आली असून पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर रुग्णवाहिका सेवा अद्यापपर्यंत निरंतर सुरु आहे.

महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकिय सेवा प्रकल्प योजना बाबत सेवा पुरवठादाराबरोबर करण्यात आलेल्या करारास मुदतवाढ देणे अथवा नविन करार करणे याबाबत शासनास शिफारस करण्यासाठी मंत्रिमंडळाने दिनांक ११.१२.२०१८ च्या बैठकीत दिलेल्या निदेशानुसार अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षेतखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदर सेवापुरवठादारास मुदतवाढ देण्याच्या शिफरशीवर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

सद्यस्थितीत सदर रुग्णवाहिका सेवेच्या संदर्भात काही प्रमाणात तक्रारी येत आहेत, मात्र प्राप्त झालेल्या तक्रारींपैकी बहुतांश तक्रारी या रुग्णवाहिका लवकर न पोहचल्याबाबतच्या आहेत. दरमहा ७२,००० हजार इतक्या रुग्णांना सदर रुग्णवाहिकांमार्फत सेवा देण्यात येत असून आलेल्या तक्रारींचे निराकरण आयुक्त,आरोग्य सेवा यांच्या कार्यालयाकडून त्वरीत करण्यात येते. शासनातर्फे रुग्णवाहिकांची देयके वेळोवेळी अदा करण्यात आली असून डॉक्टरांचे वेतन हे सेवा पुरवठादारामार्फत वेळेवर दिले जाते असा अहवाल प्राप्त झाला आहे.

**************

नियम १०५ अन्वये लक्षवेधी सुचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२० चे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्रीराजेंद्र पाटणी., वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना

.......................................................................................................................

"वाशिम जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागात २५ प्राथमिक आरोग्य केंद्र व १५३ उपकेंद्र सद्यस्थितीत कार्यान्वित असणे, वाशिम जिल्हयाच्या सन २००१ च्या जनगणनेनुसार पाहता शासनाच्या मानकास अनुसरुन दर ३० हजार लोकसंख्येला १ प्राथमिक आरोग्य केंद्र याप्रमाणे २८ प्राथमिक आरोग्य केंद्रांची आवश्यकता असल्याचे निदर्शनास येणे, ३ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर असणे, तथापि सन २०११ च्या बृहत आराखडयानुसार जिल्हयात आणखी ६ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राची आवश्यकता असल्याचे निदर्शनास येणे, नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता दिनांक १४.०८.२००६, २७.०१.२०१० व दिनांक १४.०८.२०१८ रोजीच्या जिल्हा नियोजन समितीच्या ठरावानुसार शासन स्तरावर प्रस्ताव सादर करण्यात आल्याची बाब निदर्शनास येणे, वाशिम जिल्हयात सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारीत बृहत आराखडयानुसार एकून ३३ प्राथमिक आरोग्य केंद्र आवश्यक असल्याने आणखी ६ प्राथमिक आरोग्य केंद्रांचा अनुशेष बाकी असणे, तसेच सन २०१३ च्या बृहत आराखडयानुसार जिल्हयात मानोरा व कारंजा तालुक्यांत एकूण १८ उपकेंद्रे प्रस्तावित असल्याची बाब निदर्शनास येणे, जिल्हयात आरोग्य विभागाकरीता जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकरीता ३ वाहने व तालुका आरोग्य अधिकारी यांना ६ वाहनांची पर्यवेक्षणासाठी आवश्यकता असल्याची बाब निदर्शनास येणे कार्यालयीन फर्निचर, प्रसुती टेबल, शस्त्रक्रियागृहामधील टेबल, औषधे ठेवण्याकरीता रॅक इत्यादी साहित्याची आवश्यकता असल्याची बाब निदर्शनास येणे, हाफकिंन संस्थेकडून वेळोवेळी औषधी पुरवठा होण्याकरीता हाफकिनच्या संबंधीत अधिका-यांना आदेशीत करण्याची आवश्यकता, वाशीम जिल्हयात कारंजा येथे उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे ९० टक्के काम पूर्ण, १० टक्के काम ३ वर्षापासून अपूर्ण तसेच आवश्यक कर्मचारी, उपकरणे इ. उपलब्ध नसणे, तसेच वाशीम येथील स्त्री रुग्णालय इमारतीचे काम ७ वर्षापासून सुरु असणे, तथापि आवश्यक साहित्य,उपकरणे, कर्मचारी, डॉक्टर यांची नेमणूक न होणे त्यामुळे रुग्णालय सुरु न होणे, त्यामुळे जिल्हयातील महिलांना होणारा त्रास, तसेच मानोरा येथे तालुक्याच्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्याची आवश्यकता, त्यासाठी तरतूर करण्याची गरज, त्या तालुक्यातील लोकांना उपचारासाठी यवतमाळ जिल्हा किंवा वाशीम येथे जाण्याची गरज निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाच्या कार्यवाही व उपाययोजना."

## मा.श्री.राजेश टोपे, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन

वाशिम जिल्हयामध्ये सद्यास्थितीत २५ प्रा.आ.केंद्रे व १५३ आरोग्य उपकेंद्रे आहेत. त्यापैकी २५ प्राथमिक आरोग्य केंद्र व १५० आरोग्य उपकेंद्रे कार्यान्वित आहेत.

सन २००१ च्या जनगणनेवर आधारित मंजूर बृहत आराखडयानुसार शासन निर्णय दि.१७-०१-२०१३ व दि.०९-०६-२०१४ अन्वये वाशिम जिल्हयामध्ये मुसळवाडी व रिठद येथे प्रत्येकी १ प्राथमिक आरोग्य केंद्र व शासन निर्णय दि.१८-०१-२०१८ अन्व्ये मौजे उकळीपेन येथे "विशेष बाब" म्हणून १ अशी एकून ३ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आली आहेत. यापैकी १ प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम पूर्णत्वाला आल्याने पदनिर्मिती करण्यात आली आहे. उर्वरीत १ बांधकाम सुरु आहे तर १ प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी बांधकामाची कार्यवाही सुरु आहे.

वाशिम जिल्हयातील ग्रामीण भागातील लोकसंख्या ९,८५,७४७ एवढी असून शासनाच्या निकषानुसार बिगर आदिवासी क्षेत्रात ३०,००० लोकसंख्येला १ प्राथमिक आरोग्य केंद्र, तर आदिवासी/दुर्गम व डोंगराळ भागात २०,००० लोकसंख्येला १ प्राथमिक आरोग्य केंद्र याप्रमाणे २०११ च्या लोकसंख्येनुसार एकुण ७ नविन प्राथमिक आरोग्य केंद्र व मानोरा तालुक्यासाठी ६ उपकेंद्रे व कारंजा तालुक्यासाठी ५ उपकेंद्रासह एकूण ३३ नविन उपकेंद्रे सुरु करण्याबाबत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि.२२-११-१७ व जिल्हा नियोजन समिती सभा दि.१४-११-१८ रोजी ठराव केला आहे.

सन २०११ च्या लोकसंख्यावर आधारीत आरोग्य संस्थाचा जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा संचालनालयास्तावर सुरु आहे. सदर मागण्या जोड बृहत आराखडयामध्ये निकषानुसार समावेश करण्याची कार्यवाही सुरु आहे.

वाशिम जिल्हयामध्ये सद्यस्थितीत २५ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असून त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार रुग्णांची ने-आण रुग्णवाहिकामार्फत करण्यात येते. तालुका आरोग्य अधिकारी यांना वाहन मंजूर नसल्यामुळे तालुका आरोग्य अधिकारी यांना वाहने पुरविण्यात आलेली नाहीत तथापि, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यासाठी नवीन वाहन उपलब्ध करुन दिलेले आहे. जिल्हयासाठी १५ वाहनांची मागणी आहे. आरोग्य सेवा, आयुक्तालयाने आमदार/खासदार निधी, डीपीडीसी/मानव विकास निधीमधून अनुदान मिळवुन जुन्या रुग्णवाहिकांच्या ठिकाणी नवीन रुग्णवाहिका खरेदी करण्याच्या मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत.

नव्याने बांधकाम झालेल्या मौजे शिरपूर,मेडशी,राजाकीन्ही या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या तसेच मौजे शेलु बु. , वारा जहा, येवता, कोळगांव, भौरद,रुई या ठिकाणी फर्निचर, प्रसुती टेबल, शस्त्रक्रिया गृहामधील टेबल, औषधी ठेवण्याकरीता रॅक तसेच इतर आरोग्य विषयक अत्यावश्यक उपकरणे व साहित्यांची आवश्यकता असुन त्यासाठी डीपीडीसीकडून अनुदान उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे.

कारंजा येथील १०० खाटाच्या रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या रॅम्प तसेच इतर कामासाठी रु.१२०.०८ लाखाच्या अंदाजपत्रक व आराखडयांना शासनाची दि. १६ नोव्हेंबर २०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून फेब्रु. २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये रु.१२०.०८ लक्ष ची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये (१) रॅम्पचे बांधकाम २) विद्युतीकरण (ट्रान्सफॉर्म) ३) फायर फायटिंग इत्यादी काम अंतर्भुत आहे. कारंजा उपजिल्हा रुग्णालय कारंजा करीता शासन निर्णय दि. १३ फेब्रुवारी २०१४ अन्वये पदनिर्मिती करण्यात आली असून गट अ ते गट ड ची एकूण ७० पदे मंजूर असून ३४ पदे भरली असून ३६ पदे रिक्त आहेत.

स्त्री रुग्णालय वाशिम येथे शासन निर्णय क्रमांक दि. १६ फेब्रुवारी २०१८ अन्वये ४२ पदे निर्माण करण्यात आली असून त्यापैकी १६ पदे भरण्यात आले आहेत व २६ पदे रिक्त आहेत. वाशिम जिल्हा स्त्री रुग्णालयाकरीता १) Multipara Monitor-6 equipment With central monitoring २) Operation theater madhe trolly 5 इत्यादि प्राप्त झालेले आहे. उर्वरीत साहित्य सामुग्रीची खरेदी हाफकीन चे स्तरावर चालू आहे.

१०० खाटांचे स्त्री रुग्णालय वाशिम येथील उर्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी शासन निर्णय दि.०४ सप्टेंबर २०१९ रु. २५६५.९२ लक्ष किंमतीस सुधारीत प्रशासकीय मान्यता आली आहे. त्यामध्ये १) विद्युत उपकेंद्र, उच्चदाब,विद्युतपुरवठा व एक्सप्रेस फिडरची उभारणी २) अग्निशामक यंत्रणा ३) उद्वाहन उभारणी ४) वातानुकुलित यंत्रणा अशी ४ कामे अंतर्भूत आहेत. वैद्यकीय अधिक्षक जिल्हा स्त्री रुग्णालय वाशिम यांनी कामाची पाहणी केली असता त्यामध्ये १९ महत्वाच्या किरकोळ बाबींची दुरुस्ती करण्यात आली नसल्यामुळे स्त्री रुग्णालयाची इमारत हस्तातंरीत करण्यात आलेली नाही.

मनोरा तालुक्यात ३० खाटाचे ग्रामीण रुग्णालय कार्यरत असून रुग्णालयाची इमारत जुनी झालेली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान मार्फत दुरुस्ती प्रस्तावित केली आहे.

**************

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२० चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

सर्वश्री. अमित झनक, अमीन पटेल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" पुणे जिल्हयातील अत्यंत महत्वाचा असलेल्या हडपसर-सासवड-जेजूरी या रस्त्याची दुरावस्था झाल्याने सदर रस्त्याचे काम बीओटी तत्वावर करण्यास मान्यता देणे, यामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार तसेच संशयास्पद गैरकारभार झालेला असण्याची गंभीर माहिती मार्च, २०२० च्या पहिल्या आठवडयात उघडकीस येणे, मनाज टोलवेज कंपनीने या रस्त्याचे काम करण्यास घेणे; रस्त्याच्या सुरुवातीच्या कामासाठी १३० कोटीची मागणी कारणे, मात्र दोन वर्षात या रस्त्याचे काम ३५० कोटी रुपये होणे, त्यास मान्यता देऊन न्यायालयात करारनामा केलेला असणे, लवादामध्ये तीन जणांची आवश्यकता असताना एक सदस्यीय लवादामध्ये मान्यता घेऊन संशयास्पद कार्यवाही करण्यात येणे, यामध्ये शासनाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, नव्याने स्थापन झालेल्या सरकारच्या काळात तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांचा शपथविधी झाला त्याच दिवशी सर्व वरिष्ठ अधिका-यांनी सदर प्रस्तावावर सहया करणे व अंतिमत: मुख्य सचिवांनाही सही करणे, अंतिम मान्यतेचीही सही त्याच दिवशी होणे, तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने दखल घेतल्यानंतर न्यायालयामध्ये खोटी कागदपत्रे सादर करुन चुकीची माहिती देणे, मंत्री व सचिव स्तरावर वेगवेगळे शपथपत्र सादर करणे, न्यायालयाने त्यावर नाराजी व्यक्त करणे, यामध्ये मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार व अनियमितता झाल्याचे दिसून येणे, त्यास वरिष्ठांचे मिळत असलेले गैरवाजवी संरक्षण, सदर संशयास्पद गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी येथील नागरीकांमधून केली जात असणे, याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, परिसरातील पुणे, सोलापूर, सातारा या जिल्हयांना जोडणारा व जेजूरी, मोरगांव सारखी जगप्रसिध्द देवस्थाने तसेच पंढरपूरला जाणा-या लाखो वारक-यांचा पालखी मार्ग असलेल्या या महत्वाच्या रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याने अपघाताचे प्रमाण वाढलेले असणे, रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करणे तसेच सदर प्रकरणी झालेल्या गैरकारभाराची सखोल चौकशी करुन कडक कारवाई करण्याची अत्यावश्यकता आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

**मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन**

"हडपसर-सासवड-बेलसरफाटा (रा.मा.६१) कि.मी. ९/८०० ते ४२/८६० व बेला-पाबळ उरुळीकांचन-जेजुरी-निरा (रा.मा.-६१) कि.मी. ११०/००० ते ११८/००० या रस्त्याचे चौपदरीकरण करणे" या रस्त्याच्या सुधारणा/चौपदरीकरणाचे काम खाजगीकरणाच्या माध्यमातून बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर करण्यास मान्यता देण्यात आलेली होती.

**ड) उद्योजकामार्फत दाखल करण्यात आलेली याचिका व विभागाने केलेली कार्यवाही :-**

- लवाद निवाड्यास जिल्हा न्यायालयाने स्थगिती दिली नसल्याने उद्योजकाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Execution Application दाखल केले व शासनाच्या मालमत्तेवर जप्ती आणण्याबाबत सदर याचिकेन्वये विनंती केली.
- सदर न्यायालयीन कार्यवाहीस स्थगिती मिळणेबाबत तसेच लवाद निवाड्यास स्थगिती मिळणेबाबत जिल्हा न्यायालय, पुणे येथे Application No.२६ दाखल करण्यात आला. तथापि, सदर अर्ज जिल्हा न्यायालयाने दिनांक २०.०९.२०१९ रोजी अर्ज खारिज केला.
- उद्योजकाने दाखल केलेल्या याचिकेची मा. उच्च न्यायालयात दिनांक २५.११.२०१९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. लवाद निवाड्यास स्थगिती न मिळणे, स्थगिती अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळणे या पार्श्वभुमिवर मा. उच्च न्यायालयामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रुपये ३८२.९३ कोटी रकमेच्या मालमत्तेवर Decree Order होण्याची व शासनाची नामुष्की होण्याची शक्यता होती.
- राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट असल्याने लवाद निवाड्यानुसार उद्योजकास रक्कम अदायगीबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळ पायाभूत समितीसमोर सादर करणे शक्य नव्हते.
- उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, शासनाच्या मालमत्तेवर संभावित जप्ती टाळण्यासाठी उद्योजकास लवादाने दिलेली रक्कम व त्यावर आर.बी.आय बँक दराने व्याज याप्रमाणे रक्कम उद्योजकास अदा करण्याबाबतचा प्रस्ताव सादर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत सादर करण्यात आला व त्यास मा. राज्यपाल महोदय यांची दिनांक २२.११.२०१९ रोजी मान्यता प्राप्त झाली.
- सदर मान्यतेच्या अनुषंगाने रक्कम स्वीकारण्याची उद्योजकाने तयारी दर्शविल्याने दिनांक १२.१२.२०१९ रोजी शासनातर्फे कार्यकारी अभियंता, सा.बां (दक्षिण), पुणे व उद्योजक दोघांनी व सरकारी अभियोक्ता व उद्योजकाचे वकील यांनी स्वाक्षरी करुन मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Consent Terms सादर केले आहे. तथापि उद्योजकाला देय रक्कमेची अदायगी न झाल्याने उद्योजकाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अवमान याचिका दाखल केली आहे.
- सदरहू अवमान याचिका प्रकरणी दि. २१.१.२०२०, दि.२४.१.२०२०, दि. २७.१.२०२०, दि.३०.१.२०२०, दि.१३.२.२०२०, दि.२४.२.२०२०, दि.२८.२.२०२०, दि.९.३.२०२०, दि.१६.३.२०२०, दि.३०.३.२०२०, दि.५.१०.२०२० व १२.१०.२०२० रोजी सुनावण्या ठेवण्यात आल्या होत्या. सदर प्रकरण सद्या मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ठ आहे.

*** ---------

एच–१८७२–२३.

c:\junaid\assembly\लक्षवेधी\lakshvedhi no ८९.docx

**लक्षवेधी सूचना**

**श्री.सुनिल प्रभु, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" पुणे-नाशिक महामार्गावरील सिन्नर बायपास रस्त्याकरीता कार्यकारी अभियंता (राष्ट्रीय महामार्ग), सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांनी ह.भ.प. शेतकरी श्री.चंद्रभान सांगळे याचेसह शेकडो शेतकऱ्यांना जमीनीच्या मोबदल्याचा योग्य दर न देता कमी-अधिक दर देऊन शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केल्याची नुकतेच उघडकीस आलेले धक्कादायक प्रकरण, सदरहू प्रकरणात रस्ता बाधीत श्री.सांगळे याच्या शेजारी राहणारे श्री.विनोद शाह या राजकीय वरदहस्त असलेल्या व्यक्तीस सा.बां.विभागाच्या कार्यकारी अधिकाऱ्याने प्रती गुंठा १५ लाख ८० हजार रूपये इतका चढा भाव देण्यात येणे, परंतु, तोच भाव न दिल्यास जमीन देण्यास विरोध दर्शविणारे बाधीत शेतकरी श्री.सांगळे यांची गट क्र.८९७ मधील ८८ आर जमीन व पाच बारमाही पाणी असलेल्या विहीरी कोणतीही नुकसान भरपाईची रक्कम न देता बेकायदेशीररित्या सक्तीने संपादीत केल्याचा घडलेला धक्कादायक प्रकार, त्याच दरम्यान सदरहू बाधीत शेतकऱ्यांनी जमीनीचा ताबा देण्यास विरोध केला असता कार्यकारी अभियंता यांनी ठेकेदारामार्फत सिन्नर पोलीस ठाण्यात कामगारांना मारहाण केल्याच्या खोट्या केसेस दाखल करून शेतकरी कुटुंबातील व्यक्तींना अटक करण्यात येऊन अपमानास्पद वागणूक देण्यात येणे, शिवाय कार्यकारी अभियंता यांनी २००९ ते २०१६ मध्ये चारवेळा नकाशात बदल करून मर्जितील व्यक्तींच्या जमीनी वगळून गरीब शेतकऱ्यांच्या जमीनी सक्तीने संपादित केल्याचा प्रकार घडणे, अशा प्रकारे येथील शेकडो शेतकऱ्यांची राष्ट्रीय महामार्गाच्या बायपास रस्त्यासाठी नवीन दरानुसार जमीनीचा व विहीरीचा भाव न देता कमी-अधिक भाव देऊन शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केल्याचा घडलेला निंदणीय प्रकार, या संदर्भात बाधीत शेतकरी श्री.सांगळे व इतरांनी दिनांक २७.०६.२०१७ रोजी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, यामुळे सदरहू शेतकऱ्यांवर झालेला अन्याय, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, परिणामी येथील बाधीत शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**मा.मंत्री (महसूल) श्री.बाळासाहेब थोरात यांचे निवेदन**

राष्ट्रीय महामार्ग क्र.५० साठी सिन्नर ते नाशिक रस्ता यामधील सिन्नर बाहयवळण रस्त्यासह चौपदरीकरणाचे काम कार्यान्वीत असून, कार्यान्वित यंत्रणा ही कार्यकारी अभियंता (राष्ट्रीय महामार्ग) ,सार्वजनिक बांधकाम विभाग ,नाशिक हे आहेत.राष्ट्रीय महामार्गाची भूसंपादन प्रक्रिया ही राष्ट्रीय महामार्ग अधिनियम,१९५६ अंतर्गत करण्यात येत आहे.

**श्री. चंद्रभान सांगळे, गटनंबर ८९७ बाबत-** पुणे – नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.५० साठी संपादित केलेल्या, मौजे सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक येथील श्री. चंद्रभान सांगळे व इतर यांच्या गट नं.८९७ पै. मधील ८८०० चौ.मी. क्षेत्र संपादीत जमीनीचा व चार विहीरींचा मोबदला रू.२२,५७,७६४/- इतक्या रक्कमेचा निवाडा दिनांक २५/११/२०११ रोजी घोषित करण्यात आलेला आहे. सदर घोषित निवाडयानुसार मोबदला स्विकारणेसाठी अंतिम नोटीस दिनांक २१/०५/२०१२ रोजी देण्यात आली आहे. परंतु अद्याप पावेतो संबंधित भूधारकांनी मोबदला रक्कम स्विकारलेली नाही. सदर संपादीत जमिनीचा मोबदला हा राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ च्या तरतुदीप्रमाणे व सन २०१० च्या शिघ्रसिध्दगणकाप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे. श्री. चंद्रभान सांगळे व इतर भूधारकांनी विहीरीची जागा वगळणे, संरेखन बदल करणे बाबत वेळोवेळी निवेदने सादर केली होती. त्याबाबत मुख्य अभियंता, (NHDP) ,Ministry of Road Transport& Highway नवी दिल्ली यांनी त्यांचे दिनांक १५/१०/२०१५ अन्वये सिन्नर-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.५० च्या मूळ मंजूर संरेखनात कुठलाही बदल करु नये, असे कळविलेले आहे. श्री.सांगळे व इतर यांनी गट नं.८९७ पै. ८८०० चौ.मी. बाबत फेरमोजणी करणेबाबत अर्ज दिला होता. त्याबाबत उपअधीक्षक, भूमी अभिलेख, सिन्नर यांच्या दिनांक ११/०७/२०१६ रोजीच्या पोटहिस्सानिहाय संपादित क्षेत्राच्या अहवालानुसार एकूण संपादित ८८०० चौ.मी. क्षेत्रामध्ये कोणताही बदल होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. त्यामुळे गट क्र.८९७ पै. मधील ८८०० चौ.मी. क्षेत्र व चार विहीरींचा ताबा दिनांक २४/०५/२०१७ रोजी पोलीस संरक्षणात घेण्यात आलेला आहे. व वाढीव दराने मोबदला मिळणेसाठी अप्पर आयुक्त तथा

लवाद भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण नाशिक विभाग नाशिक यांचेकडे अर्ज दाखल करण्यास कळविण्यात आले आहे.

**श्री. किर्ती कुमार हरीशचंद्र शहा, गटनंबर ८९६ बाबत-** पुणे – नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.५० साठी संपादित केलेल्या मौजे सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक गटनंबर ८९६ पै. मधील २८०० चौ.मी. क्षेत्र व ९०८/२ पै. मधील २१०० चौ.मी. क्षेत्र या संपादित जमिनीचा निवाडा दिनांक २५/११/२०११ रोजी घोषीत करण्यात आलेला आहे. श्री.किर्तीकुमार हरीशचंद्र शहा व विष्णू नारायण वरंदळ यांनी दिनांक ०४/०३/२०१६ व १६/०५/२०१६ रोजी सदर संपादित क्षेत्राबाबत तक्रार अर्ज सादर केलेले आहेत. त्या अनुषंगाने उप अधिक्षक,भूमी अभिलेख सिन्नर यांनी गटनंबर ८९६ व ९०८/२ ची नविन / पुर्नमोजणी व फेर सर्वेक्षण करून त्याचा अहवाल दिनांक ०४/०७/२०१६ रोजी सादर केलेला असून त्यानुसार गट क्र.८९६/३पै. मधील पुर्वीचे २८०० चौ.मी. क्षेत्र व नव्याने ५३०० चौ.मी. क्षेत्र असे एकूण ८१०० चौ.मी. क्षेत्र व गट नं.८९६/४ मधून ३८०० चौ.मी. क्षेत्र असे दोन्ही मिळून एकूण ११९०० चौ.मी. क्षेत्र संपादित होते.

गटनंबर ८९६/३ पैकी, ५३०० चौ.मी. क्षेत्र या नव्याने संपादित झालेल्या जमीनीचा मोबदला भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुर्नस्थापना करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या तरतुदी नुसार व सन २०१७ च्या शिघ्र सिध्दगणकानुसार रु.८,४२,७०,०००/- इतका दि.२९/०९/२०१७ रोजी थेट खरेदीने अदा करणेत आलेला आहे.

तसेच , गट नं.८९६ व ८९७ या गटाची संपादन क्षेत्राची मोजणी करण्यास गेलेल्या मोजणी पथकास मारहाण करण्यात आल्यामुळे गुन्हा नोंदविण्यात आला होता व तद्नंतर वरील दोन्ही गटांची मोजणी ही पोलीस बंदोबस्तामध्ये करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणात संपादित करण्यात आलेल्या गट नं.८९७ मधील ८८०० चौ.मी. जमिनीसाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ च्या तरतुदी व सन-२०१० च्या वार्षीक बाजारमूल्यदर तक्त्यानुसार मोबदला परिगणित करण्यात आलेला आहे. तसेच गट नं.८९६ साठी नविन भूसंपादन कायदा, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुर्नस्थापना करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या तरतुदी प्रमाणे व सन २०१७ च्या शिघ्र सिध्दगणकानुसार थेट खरेदीने भूसंपादन रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

त्यामुळे दोन्ही गटांचा मोबदला निश्चित करुन उपरोक्त नमूद दोन कायदयातील कार्यपध्दतीमुळे नूकसान भरपाईची अदा करण्याची रक्कम ही वेगवेगळी आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.५० वरील भूसंपादनाचे काम मूळ मंजूर संरेखनाप्रमाणे करण्यात आलेले असून संपादित क्षेत्रामध्ये मर्जीतील व्यक्तींच्या जमिनी वगळून गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी सक्तीने संपादित करण्याचा व शेकडो शेतकऱ्यांची, राष्ट्रीय महामार्गाच्या बायपास रस्त्यासाठी नवीन दरानुसार जमिनीचा व विहिरीचा भाव न देता कमी अधिक भाव देऊन शेतकऱ्यांची फसवणूक करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

******************************************************

H/1849-19

९२३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

सर्वश्री. अबू आजमी, रईस शेख विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

**"मुंबई स्थित मानखुर्द मंडळा कुर्ला स्क्रॅप परिसरात वाशी खाडीच्या नाल्यात बेकायदा तेल व रसायने अजूनही सोडण्यात येत असल्याने वनस्पती आणि जलचरांची हानी होण्याबरोबरच रोहित पक्ष्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असून रसायनांमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यालाही निर्माण झालेला धोका, परिसरात बांधण्यात आलेल्या बेकायदा गाळयांमध्ये धोकादायक ज्वालाग्राही भंगार साहित्य साठवले जाते त्यामुळे वारंवार भीषण आगी परिसरात लागणे, आगीनंतर बेकायदे गाळे पुन्हा उभारले जाणे अतिक्रमण करून आजुबाजुच्या मोकळया जागेत अधिक गाळे बांधण्यात येणे. सदर जागेचा करार १० वर्षापासून संपलेला असून सदर जागेमध्ये अनधिकृत अतिक्रमण अदयापर्यंत असून ठरलेल्या क्षेत्रापेक्षा चारपट क्षेत्रामध्ये अनाधिकृत अतिक्रमण करणे, सदर घटनामुळे जनसामान्यामध्ये वाढत चाललेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया".**

---

## मा.मंत्री (पर्यावरण) यांचे निवेदन

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, मौजे, मानखुर्द ता. कुर्ला स.नं. १३८ पे. न.भू.क्र. १/१ मधील ९ एकर व मौजे, मंडळा स. नं. ८० पे येथील ६ एकर अशी मिळून एकूण १५ एकर जमीन ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने भंगार साठविण्यासाठी व मौजे. मंडळा स.नं.८० मधील ९ गुंठे जमीन पोहोच रस्त्याकरीता १० वर्षाच्या अनुज्ञाप्ती तत्वावर शासन आदेश दिनांक ०२ जून,१९७६, दिनांक २५ ऑगस्ट,१९७६ अन्वये कुर्ला स्क्रॅप मर्चंटस असोसिएशन यांना मंजूर करण्यात आली होती. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश दिनांक १६ सप्टेंबर,१९७६ रोजी पारीत करण्यात आले होते. सदर ३० वर्षाचा भाडेपट्टा कालावधी सन २००६ मध्ये संपुष्टात आलेला आहे. भाडे पट्टेदार कुर्ला स्क्रॅप मर्चंटस असोसिएशन यांनी जागेवर केलेल्या शर्तभंगाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात सूनावणी होऊन दिनांक ३० एप्रिल,२०१६ रोजी आदेश पारीत करण्यात आले होते. सदर आदेशाविरुध्द भाडे पट्टेदार संस्थेने मा. अपर आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे अपिल दाखल केले होते. त्यामध्ये मा. अपर आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक २९ नोव्हेंबर,२०१७ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये संस्थेचा अपिल अर्ज फेटाळून जिल्हाधिकारी कार्यालयाकडील दिनांक ३० एप्रिल,२०१६ रोजीचे आदेश कायम ठेवले होते. तद्नंतर भाडेपट्टेदार संस्थेने जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश दिनांक ३० एप्रिल,२०१६ व अपर आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील दिनांक २९ नोव्हेंबर,२०१७ रोजी च्या आदेशाविरुध्द मा. मंत्री (महसूल) यांच्याकडे पुनर्विचार अर्ज दाखल केला होता. तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयात क्र. ८१२/२०१९ याचिका देखील दाखल केली होती. सदर याचिकेवर मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ३० एप्रिल,२०१९ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये दोन महिन्यात अर्जदाराच्या याचिकेवर निर्णय घेणेबाबत शासनास आदेशित केले होते व

भाडेपट्टादार संस्थेविरुध्द कोणतीही सक्तीची कारवाई करणेस मनाई केली आहे. <u>सद्यस्थितीत सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.</u>

लोकप्रतिनिधीकडून प्राप्त तक्रार तसेच वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व तक्रारदार यांनी दिनांक ०६ मार्च,२०१९ रोजी कुर्ला स्क्रॅप परिसरास संयुक्त पहाणी केली असता, सदरील जागेवर विविध प्रकारचे भंगार गोळा करुण त्याचे विलगीकरणाचे व टाकाऊ तेल साठवण्याचे काम चालत असल्याचे आढळले, सदरील ठिकाणी साठवलेल्या तेलावर कुठल्याही प्रकारची प्रक्रीया होत असल्याचे निदर्शनास आले नाही. सदरील जागा ही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या मालकिची असल्याचे व त्या ठिकाणी असलेले उपक्रम (Activity) हे उघड्यावर आहेत व सदरील जागेस प्लॉट मार्कीग किंवा प्लॉट नंबर नसल्याचे आढळले. तसेच त्या ठिकाणच्या उपक्रमांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडुन जल जोडणी व विज जोडणी नसल्याचे निदर्शनास आले. मानखुर्द घाटकोपर लिंक रोडवरील कुर्ला स्क्रॅप मंडळा या ठिकाणी अनधिकृतरित्या केल्या जात असलेल्या ज्वलनशील पदार्थाच्या साठ्याबाबत कारवाई करण्याबाबत दिनांक १२ मार्च,२०१९, दिनांक २० ऑगस्ट,२०१९ व दिनांक १७ जानेवारी,२०२० रोजीच्या पत्रान्वये उप जिल्हाधिकारी (अतिक्रमन), चेंबूर- २ / तहसिलदार, कुर्ला (पुर्व) यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कळविण्यात आले होते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक २९ जून,२०१९ रोजी संपुर्ण परिसराची पुन्हा पहाणी केली असता सदरील ठिकाणी घाणीच्या तेलापासुण साबण तयार करणारे सात अनधिकृत कारखाने आढळुन आले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २९ जून,२०१९ रोजी सदरील सातही कारखान्यांना उत्पादन बंद करण्याचे आदेश पारीत करण्यात आले आहेत. दिलेले निर्देशांच्या अंमलबजावणीच्या पाहणीसाठी दिनांक १७ ऑक्टोबर,२०१९, दिनांक १९ सप्टेंबर,२०१९ रोजी पाहणी केली असता साबणाच्या घानी बंद स्थितीत आढळुन आल्या आहेत. याचबरोबर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तहसिलदार कार्यालय, कुर्ला व उपजिल्हाधिकारी अतिक्रमण यांनाही सदरील उद्योगांवर कारवाई करण्याबाबत दिनांक १७ जानेवारी, २०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सदरील जागेचे पुनश्चः तपासणी दिनांक २३ सप्टेंबर,२०१९ व दिनांक २४ सप्टेंबर,२०१९ रोजी सर्वेक्षण करण्यात आले व परिसरातील उपक्रमांची पहाणी केली. पहाणी दरम्यान सदर परिसरात एकूण ११५ उपक्रमांना भेटी देण्यात आल्या. सदरील ११५ उपक्रमांपैकी १०७ उपक्रम हे मुख्यत्वे करुन विविध स्क्रॅप जसे की, प्लास्टीक, लाकुड, कागद इत्यादी फक्त साठवनूकीचे काम करताना व काही प्रमाणात गरज पडल्यास सादरील स्क्रॅप कटींग करुन त्याची विक्री केली जात असल्याचे अढळले. सदरील प्रकारच्या उपक्रमांसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संमतीपत्राची आवश्यकता नाही. उर्वरित आठ उपक्रम हे Electroplating, Powder coating, Marble cutting इत्यादी प्रकारच्या प्रक्रीया करत असल्याचे आढळुन आले व त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदरील आठ उपक्रमांस दिनांक ०७ नोव्हेंबर,२०१९ बंद करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सहाय्यक उपाध्यक्ष अदानी इलेक्ट्रीसीटी यांनी दिनांक २४ जानेवारी,२०२० च्या पत्रान्वये सदरील आठही उपक्रमांचे वीज जोडणी खंडीत केल्याबाबत कळविले आहे.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-६, चेंबूर, मुंबई यांचेकडून दिनांक ०९ मार्च,२०२० च्या ई-मेल द्वारे प्राप्त अहवालानुसार, सदरील जागेवर काही इसमाकडून काळ्या तेलाची साठवणुक करण्यात येत होती. त्यांचेवर, कलम भा. द. वि. कलम २८५, ४४७, ३४ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम १५ (१) (२) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व मुद्दा माल जागीच सिल करुन ठेवण्यात आला आहे. जप्त मुद्दा मालाची गुणवत्ता तपासली असता ते घातक घनकच-यात वर्गीकृत असल्याचे नमुद केले आहे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट मे. मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. तळोजा, नवी मुंबई यांचेकडे करणे आवश्यक आहे व त्याबाबत,जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, यांना दिनांक १४ ऑक्टोबर,२०१९ च्या पत्रान्वये कळविले आहे.

शासन निर्णय दिनांक २३ मार्च,२०१९ च्या अनुषंगाने दिनांक १४ ऑगस्ट,२०१९ रोजी जिल्हास्तरीय सागरतटीय व्यवस्थापन समितीची मासिक आढावा बैठक जिल्हाधिकारी दालनात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी सदरील जागेवरील मुद्दा माल मेसर्स मुंबई वेस्ट मॅनेजमेंट यांचेकडे विल्हेवाट करण्यासाठी लागणा-या खर्चाबाबत मेसर्स मुंबई वेस्ट मॅनेजमेंट यांनी दिलेल्या अंदाजित रक्कमेची माहिती समितीला देण्यात आली होती.

सदरील साठवणुक करण्यात आलेले काळे तेल हे घातक घनकचऱ्यामध्ये वर्गीकृत असल्याने त्याची विल्हेवाट शात्रोक्त पध्दतीने मेसर्स मुंबई वेस्ट मॅनेजमेंट, तळोजा यांचेकडे करणे आवश्यक आहे.

*************